

# <u>प्रतिज्ञापत्र</u>

**'मृत्युंजय', 'छावा', 'युगंधर' या तीन कादंबऱ्यांवर आधारीत 'शिवाजी सावंत यांच्या कादंबरीतील नायक' या विषयावरील सदरचा शोध निबंध मी शिवाजी विद्यापीठाच्या एम. फिल. (मराठी) पदवीकरिता लिहिलेला आहे. हा शोध निबंध अथवा त्याचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही, कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.**

सातारा.

दिनांक : १० / ३ /२००७

**श्री. कुलकर्णी निलेश शरद**

(अभ्यासक)

छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.

## ऋणनिर्देश

वयाच्या अवघ्या सत्तावीसाव्या वर्षी 'मृत्युंजय' सारखी लोकप्रिय तेचा उंच्चाक स्थापन करणारी कादंबरी लिहीणाऱ्या शिवाजी सावंतांनी साठोत्तरी मराठी साहित्यातील अस्तित्ववादी साहित्य मूल्यांना झुगारुन 'मृत्युंजय', 'छावा', युगंधर या सारख्या भारतीय संस्कृतीवर आधारलेल्या अभिजातवादी कलाकृतींची निर्मितीकेली आहे.

विषय निवडी मागील भूमिका - या विषयाकडे वळण्यापूर्वी माझी भूमिका स्पष्ट करणे अत्यंत गरजेचे आहे. बालपणा पासूनच माझ्या मनामध्ये शिक्षक आणि शिक्षिकेपेक्षा या बद्दल गूढ असे आकर्षण होते. माझे प्राथमिक शिक्षण गावातीलच शाळेमध्ये झाले. त्यानंतरच्या शिक्षणासाठी गावापासून १० कि.मी. अंतरावर असलेल्या रहिमतपूर यागावी जावे लागत असे. बसेसची गैरसोय ही ग्रामीण भागातील प्रमुख अडचण आमच्या गावी होती. परंतु शिक्षण घेण्याची जिद्द आणि घरच्यांचा पाठिंबा ह्यामुळे मी कोणत्याही अडचणीपुढे हात न टेकता. १२ वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. ज्यावर्षी मी १२ वी पास झालो, त्याच वर्षी माझ्या कुटूंबियांनी कौटुंबिक कलहांना टाकण्यासाठी किरोली या आमच्या गावचा निरोप घेतला व सातारा शहरामध्ये आम्ही वास्तव्य केले. हा निर्णय माझ्या शैक्षणिक कारकीर्दीला अतिशय पोषक झाला. छ. शिवाजी कॉलेज, सातारा येथे मी पदवीच्या वर्षाला प्रवेश घेतला. अजिंक्यताऱ्याच्या कुशीत बसलेल्या आमच्या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वातावरणात रमत तेथील शैक्षणिक सुविधांचा प्रोत्साहनांचा उपयोग करुन घेत. 'एम. ए.' पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.

बी. ए. ते एम. ए हा पर्यंतचे शिक्षण पूर्ण करीत असताना मी अनेकवेळा कथा, कादंबऱ्या व कविता इ. वाङमय प्रकारांच्या कलाकृतींचे वाचन केले. या वाचनाच्या ओघात मला महाविद्यालयातील ग्रंथालयाकडून 'मृत्युंजय' ही कादंबरी मिळाली. ही कादंबरी वाचल्यानंतर मग मी एका वेगळ्याच विश्वात गढून गेलो. याच काळात 'अशी मने असे नमुने' हे शिवाजी सावंतांचे व्यक्तीचित्रणाचे पुस्तक आम्हांला अभ्यासाला आले. सहाजिक माझ्या मनात शिवाजी सावंत ह्या व्यक्तिमत्वाविषयी अधिकच आकर्षण दाटू लागले. परिणामी मी माझ्या वर्ग शिक्षकांशी चर्चा करुन व ग्रंथालयाशी संपर्क ठेवून शिवाजी सावंतांच्या 'छावा', 'युगंधर' ह्या दोन कादंबऱ्या मिळविल्या आणि बेभान होऊन त्या वाचून पूर्ण केल्या. अर्थात यावेळी महाविद्यालयीन अभ्यासाकडे माझे थोडे दुर्लक्ष झाले हा भाग निराळा.

शिवाजी सावंताच्या ह्या तीन कादंबऱ्या वाचीत असताना मला भावलेले त्यातील नायक रथसप्तमीसारख्या हिंदू सणाला भारतीय स्त्रिया सूर्याला औक्षण करुन त्याच्या सारख्या तेजस्वी पुत्र व्हावा अशी मागणी करतात. म्हणजे एका अर्थाने त्या कर्णासारखा पुत्र मागतात. मात्र त्याच कर्णाचे हवेतसे वाभाडे समाजात काढले जातात. संभाजीला धर्मवीर म्हणून समाजात मानले जाते. परंतु त्याच्या बदफैलीपणाची चर्चा त्याच समाजात केली जाते. श्रीकृष्ण हा पूर्ण अवतार मात्र त्याला सुद्धा गैरकृत्य करणारा ठरविण्यापर्यंत काहींची मजल जाते. अशा विवाद्य नायकांची निवड करुन सावंतांनी तीन कादंबऱ्या लिहिल्या आहेत. सहाजिकच माझ्या मनात या तीनही नायकांचा चिकित्सक अभ्यास करण्याची इच्छा निर्माण झाली आणि माझ्या लघुशोध प्रबंधासाठी कर्ण, संभाजी, श्रीकृष्ण या नायकांची निवड केली. या प्रबंधामध्ये मी शिवाजी सावंतांनी या तीनही नायकांच्याठायी कोणकोणत्या गुणवैशिष्ठ यांना अविष्कृत केले आहे. याचा चिकित्सक अभ्यास करुन ते मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

यामुळे मलाही साहाजिकच महाभारतासारख्या महाकाव्यांचा व शिवकालीन इतिहासाचा एका वेगळ्याच दृष्टीकोनातून परिचय झाला.

या लघुप्रबंधासाठी मला मदत करणारे बरेच जण आहेत. मला मार्गदर्शिका लाभल्या त्या डॉ. सौ. नलिनी महाडीक यांच्या समर्थ मार्गदर्शनामुळेच मी हा शोधनिबंध पूर्ण करु शकलो. माझ्या अनेक घरगुती अडचणीमुळे माझ्या हातून होणाऱ्या चुकांना त्यांनी समजून घेतले. त्यांच्या डोंगर एवढ्या उपकारांची जाणीव मला सतत राहील. त्यांच्या ऋणांतुन मुक्त होण्याऐवजी त्यांच्या ऋणातच रहाण्यात मला धन्यता वाटते. त्याचबरोबर ज्यांनी मला एम. फिलसाठी प्रेरणा दिली. सातत्याने माझ्या कामाचा वरेचवर चौकशी करुन मला दिशा दाखविले. त्या डॉ. भरत सगरे यांचा देखील मी शतशः ऋणी आहे. हा लघुशोध प्रबंध पूर्ण करण्यासाठी आवश्यक त्या संदर्भ ग्रंथांची माहिती होडग सर (मुरगूड) यांनी दुरध्वनी वरुन मला दिली. त्यांचाही देखील मी ऋणी आहे. तसेच हा लघुशोध प्रबंध पूर्ण करण्यासाठी 'शिवाजी सावंतांच्या पत्नी' मृणालिनी सावंत व शिवाजी सावंतांचे बंधुवत जयराम देसाई (पाचवा सावंत), कॉन्टीनन्टेल प्रकाशनचे मालक अनिरुद्ध कुलकर्णी, साहित्य मंडळाचे सदस्य मिलिंद जोशी, शिवाजी सावंतांचे परम मित्र शांताराम बापू वाघ यांनी माझ्यासारख्या लहान माणसाला सुद्धा आदराची व आपलेपणाची दिलेली वागणूक आणि त्यांचा पाहुणचार मी कधीही विसरु शकत नाही. तसेच कोणतीही अडचण माझ्यापर्यंत येऊ न देता. त्यांनी मला जेजे लागेल

तेते पुरविण्यात कधीही हलगर्जीपणा केला नाही. अशा माझ्या कुटूंबियांच्या आशिर्वादाने प्रोत्साहनाने मी हे काम पूर्ण करु शकलो. कॉलेजमधील मराठी विभागातील डॉ. सौ. भुतकर मॅडम, डॉ. शिवाजी पाटील, मानसी लाटकर यांनी विचारपूस करुन मार्गदर्शन केले. त्याचबरोबर आमच्या कॉलेजचे प्राचार्य के. एस. मोहिते यांनीही वेळोवेळी संशोधन कामाची चौकशी करुन काम पूर्ण करण्यास प्रेरणा दिली. या सर्वांचा मी शतशः ऋणी आहे. या कामासाठी मला छत्रपत्री शिवाजी कॉलेज, सातारा मधील ग्रंथालयाकडून देखील संदर्भग्रंथ, पुस्तके, नियत कालिके इ. साहित्य उपलब्ध झाले. या सहकार्याबद्दल त्यांच्या प्रमुखांचा व सेवकांचा मी अत्यंत आभारी आहे. या शिवाय माझ्या ज्ञात अज्ञात अशा अनेक शुभचिंतकांचा सुध्दायात खारीचा वाटा आहे.

शिवाजी सावंतांनी 'मृत्युंजय', 'छावा', 'युगंधर' यासारख्या महान कलाकृतींची निर्मिती केली. मी त्यांच्या ह्या कलाकृतीवर लघुशोध प्रबंधाची निर्मिती करु शकलो. या कामाच्या निमित्ताने त्यांच्याशी भेट होऊ शकलो असतो..... हा सुयोग माझ्या मात्र भाळी नाही.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

इति लेखन सीमा !

ठिकाण - सातारा.

दिनांक - १० / ३ /२००७

श्री. कुलकर्णी निलेश शरद

# आईस

असतात उद्याची रंग-गंधमय फुले,
ज्याकळीकळीतून पाकळ्या अवगंठून,
त्या अफुट कळ्यांना तरेल स्पर्शानं जगविणाऱ्या,
शरदाच्या दहिवरल्या पहाट वाऱ्याची झुळूक तू....
जे इथे जगते त्या साऱ्याचीच,
'पायधूळ' मस्तकी झेलताना,
थुकीचेच 'भूषण' माननाऱ्या,
सर्वोदार 'धरित्रीसारखी' तू...
जिच्या पायठशांवर उमटत जातात,
साहित्य, संगीत, नृत्य-नाट्य अशा,
ललितकलांची जीवनदायी राऊळे,
त्या 'मयूरस्पर्शी' सरस्वतीची लाडकी लेकचं तू....

